# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर आणि अहमदनगर येथून एकाच वेळी प्रकाशित

मंगळवार, दि. ८ ऑगस्ट १९९५ ● सर्वाधिक वाचकांचे सर्वांगीण मराठी दैनिक ● किंमत २ रु. (पृष्ठे १२)





राधा कालिनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टद्वारा कान्हे फाटा येथे चालविल्या जाणाऱ्या साईबाबा सेवा धामच्या ग्रामीण विकास प्रकल्पाला राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी भेट दिली त्याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राज्यपाल, विश्वस्त प्रेम दर्यानानी, नाना चुडासामा आणि प्रमोद नवलकर छायाचित्रात दिसत आहेत.

## राधा कालिनदास ट्रस्टची महात्मा गांधींना श्रद्धांजली

मुंबई, सोमवार (लो. प्र.) – 'राधा कालिनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट'ने उभारलेल्या 'साई बाबा सेवा धाम' संस्थेने महात्मा गांधींच्या ग्रामविकास कार्याची कल्पना अस्तित्वात आणून त्यांना आदरांजली अर्पित केली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील कान्हे फाटा येथील संस्थेच्या प्रकल्पास भेट दिल्यानंतर केले.

'साई बाबा सेवा धाम' संस्थेने ग्रामीण विकासासंदर्भात १० विविध प्रकल्प सुरू केले आहेत. या प्रकल्पाची पाहणी राज्यपालांनी सपत्निक गुरुवारी केली. याप्रसंगी परिवहन मंत्री प्रमोद नवलकर, डॉ. उषा मेहता, नाना चुडासामा, इस्माइल कांगा आदी मान्यवर उपस्थित होते. ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्थ प्रेम के. दर्यानानी यांनी सर्वांचे स्वागत केले.

याप्रसंगी श्रीमती अक्कमा अलेक्झांडर यांच्या हस्ते संस्थेच्या व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १४ विद्यार्थिनींना शिलाई यंत्रे देण्यात आली. त्याचप्रमाणे संस्थेच्या कार्याला वाहून घेतलेल्यांना श्रीमती अलेक्झांडर यांच्या हस्ते मानचिन्ह देण्यात आली.